हुतात्मा स्मारके

देखभाल व परिरक्षा समिती ....

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
पुरक पत्र, क्रमांक:-पीओअेस. हुस्माक/१०९१/स्वासैकक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २८ डिसेंबर, १९९१.

वाचा:- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-हुस्माक-१०८२/१२३, दि. २०. ७. ८३.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस-हुस्माक-१०८२/१२३, दि. २६. ९. ८३.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-हुस्माक-१०९०/स्वासैकक्ष, दि. ११जून, १९९०.

====

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओअेस. हुस्माक/१०९०/स्वासैकक्ष, दिनांक ११. ६. ९० अन्वये प्रत्येक हुतात्मा स्मारकासाठी देखभाल व परिरक्षा समिती नेमण्यास मान्यता देण्यात आली. समितीची रचना व कार्ये काय असावीत याबाबतही सदर आदेशामध्ये खुलासा करण्यात आला परंतु समितीचे सचिव कोण असावेत आणि समितीच्या सभा केव्हा घेण्यात याव्यात याबाबत आदेशामध्ये कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण करण्यात आलेले नसल्यामुळे काही हुतात्मा स्मारक समित्या नेमूनही अद्यापपर्यन्त बैठका घेण्यात आलेल्या नाहीत. या संदर्भात शासन आता असे आदेश देत आहे की, जिल्हापरिषद क्षेत्रातील हुतात्मा स्मारकाचे काम पाहण्यासाठी समितीचे सचिव म्हणून संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्यांनी नेमलेला अधिकारी काम पाहील, तर नगरपरिषद क्षेत्रामध्ये संबंधित नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी, हा समितीचा सचिव म्हणून काम पाहील.

समितीची सभा किमान दोन महिन्यातून एकदा घेण्यात यावी. तसेच झालेल्या बैठकीचा अहवाल शासनाच्या स्वातंत्र्य सैनिक कक्षास पाठविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[चं. रा. चव्हाण]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी अग्रेषित :
राज्यपाल यांचे सचिव,

मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मुंबई,
राज्यमंत्री, सामान्य प्रशासन विभाग यांचे खाजगी सचिव,
सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मुंबई
सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
सचिव [सामान्य] सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/महालेखापाल, महाराष्ट्र राज्य१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य २, नागपूर/अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व साधारण नस्तीसाठी,
निवड फाईल [२ प्रती]